नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०६/०८/२०२४ (मंगळवार) सकाळ

### खापा, सावनेर, कळमेश्वर परिसरात लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळविणाऱ्या दोन संघटीत टोळीतील टोळी प्रमुख व त्यांचे साथिदारांवर उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर तसेच पोलीस स्टेशन खापा यांची कारवाई

दि. ०५/०८/२०२४ रोजी खापा पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, रहीम पठाण व महिला आरोपी यांनी लोकांकडुन वरळी मटक्याचे आकडे लावुन पैशांचे हारजीतचा जुगार खेळ खेळविण्यासाठी परिसरातील वेगवेगळया गावांमध्ये काही माणसं नेमलेली असुन ती नेमलेली माणसं दिवसभर त्यांचे नेमलेल्या गावात लोकांकडुन वरळी मटक्याचे आकडे लावुन पैशांचे हारजीतचा जुगार खेळ खेळवितात व दिवसभराचा हिशोब मौजा चोरखैरी ता. सावनेर येथे राहणारा ईसम नामे विलास ठाकरे याला देत असतात. विलास ठाकरे हा दररोजच्या हिशोबाची नोंद त्याचेकडे असलेल्या वहीमध्ये घेत असतो. यावरून मा. श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनात सपोनि सुनिल दहीभाते ठाणेदार पो.स्टे. खापा व त्यांचे पोलीस स्टेशनच्या पथकाने विलास उर्फ शिशुपाल पांडुरंग ठाकरे वय ४७ वर्षे रा. चोरखैरी ता. सावनेर याचे घरी जावुन धाड टाकली असता विलास उर्फ शिशुपाल पांडुरंग ठाकरे याचे ताब्यात सट्टापट्टीच्या नोंदी असलेल्या रजीस्टर तसेच त्याचे मोबाईल मध्ये सट्टीपट्टीच्या नोंदी असलेल्या कागदांच्या फोटो ईतर आरोपींना पाठविले असल्याचे दिसुन आल्याने त्याचे ताब्यातुन एकुण १५,०३५/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच त्याने सांगितले की, १) मधुकर शेंडे रा. सिंदेवानी ता. सावनेर २) जयपाल गोंडाने रा. कोच्छी ता. सावनेर ३) बालु उर्फ प्रदीप पांडे रा. खुबाळा ता. सावनेर ४) विश्वनाथ आत्राम रा. सोनपुर ता. सावनेर ५) उदय वासनिक रा. सिरोंजी ता. सावनेर ६) धनेश सहारे रा. नागलवाडी ता. सावनेर ७) सुनिल उईके रा. टेंभुरडोह ता. सावनेर ८) सचिन राउत रा. टेकाडी ता. सावनेर ९) दिलीप सपकाळ रा. बडेगाव हे रहीम पठाण व महिला आरोपी दोन्ही रा. बडेगाव ता. सावनेर यांचे सांगणेवरून वेगवेगळया गावांमध्ये दिवसभर लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळवतात. त्यांचे दिवसभराचा हिशोब विलास उर्फ शिशुपाल पांडुरंग ठाकरे हा वहीमध्ये नोंद करीत असतो. तसेच रहीम पठाण व महिला आरोपी हे कळमेश्वर येथिल बलराम नावाच्या ईसमास सट्टापट्टीच्या आकडयांची उतारी देत असतात. सर्व आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन खापा येथे अप. क्र. ३४१/२०२४ कलम ११२,३(५) बी.एन.एस. २०२३ सहकलम १२(अ) मजुका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन अधिक तपास सुरू आहे.

तसेच दिनांक ३०/०७/२०२४ रोजी ज्ञानेश्वर रामाजी गोडबोले रा. बडेगाव हा टेंभुरडोह येथे लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळवतांना मिळुन आल्याने त्याचेकडुन एकुण ११२५/— रू. चा माल जप्त करून त्याचेविरूध्द अप. क्र. ३३७/२०२४ कलम १२(अ) मजुका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयात आशिष अशोक बागडे, रा. बडेगाव याचे सांगणेवरून ज्ञानेश्वर रामाजी गोडबोले, शांताराम कृष्णाजी ठाकरे रा. बडेगाव व प्रविण उपासराव शेंदरे रा. बडेगाव हे वेगवेगळया गावांमध्ये लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळवितात व नंतर आशिष अशोक बागडे हा नतीन

नबीरा रा. सावनेर तसेच चेतन तिवारी रा. कळमेश्वर यांना सट्टापट्टीच्या आकडयांची उतारी देत असतो असे निष्पन्न झाल्याने या गुन्हयातसुध्दा कलम ११२, ३(५) बी.एन.एस. २०२३ प्रमाणे कलमवाढ करण्यात आली असुन अशा एकुण १९ आरोपींविरूध्द कायेदशिर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

अशाप्रकारे रहीम पठाण, ०१ महिला आरोपी, आशिष बागडे हे आपली संघटीत टोळी तयार करून गावागावांमध्ये लोकांकडुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळवितात व गावातील तरूणांना जुगाराच्या सवई लावुन त्यांचे भविष्य अंधारात टाकण्याचे काम या टोळया करीत आहेत. अशाप्रकारचे संघटीत गुन्हे करणाऱ्याविरूध्द भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ११२ अन्वये या प्रकारची कार्यवाही ही नागपुर ग्रामीण जिल्हयामध्ये पहिल्यांदाच झालेली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) यांचे मार्गदर्शनात सपोनि सुनिल दहीभाते ठाणेदार पो.स्टे. खापा, सफौ विकास बेलसरे, पोहवा विशाल महालकर, पोहवा पंकज ठाकुर, पोना संतोष परतेती, पोशि नितेश चिपडे, पोशि पन्ना बटाउवाले, पोशि नितेश पुसाम यांनी केलेली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**